विशेष दिवाणी दावा नं.४५४/२०२३

धर्मेश वि. सतपाल

निशाणी क्र.१३० चा भाग

<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री एस एस देसाई यांचेमार्फत सुरु</u>

माझे प्रतिज्ञापत्रामध्ये कोणत्याही इ मेल आय डीचा उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वापरात असलेले कॉम्प्युटर व प्रिंटरचे विवरण प्रतिज्ञापत्रात दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी भारतीय पुरावा अधिनियम ६५ब प्रमाणे प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी माझे प्रतिज्ञापत्रासोबत कोणत्याही इ मेलचे प्रिंट आऊट सादर केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा मोघम स्वरुपाचा आहे. मी मागील १५ वर्षापासून वादीसोबत काम करतो. हे म्हणणे बरोबर आहे की, मी या प्रकरणाशी माझा सुरुवातीपासून संबंध आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, दि.१३/०४/२०१२ रोजी पाचगणी पोलीस स्टेशन येथे माझी कंपनी फोरसिझन्स डेवलपर्स प्रा लि. चे वतीने मी तक्रार दिली होती. आता मला दाखविलेला दस्त तीच तक्रार आहे. त्यावर माझी सही आहे. सदर तक्रारीतील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास <u>निशाणी क्रमांक १३३</u> देणेत येते. त्यानंतर मी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी महाबळेश्वर यांचेकडे सदर कंपनीच्या वतीने लेखी तक्रार दि.१७/०५/२०१२ रोजी दाखल केली. सदर प्रकरणात त्यातील आरोपींच्या विरुध्द दि.२३/०७/२०१२ रोजी इश्यु प्रोसेसचा आदेश झालेला आहे. त्यातील आरोपींनी मा. सेशन कोर्टात रिवीजन दाखल केले होते व सदर तक्रार खारीज करणेत आली. आता मला दाखविलेला दस्त सदर तक्रारीची प्रमाणीत प्रत आहे. सदर तक्रारीतील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूराची मी सत्यपडताळणी केलेली आहे. त्यास <u>निशाणी क्रमांक १३४</u> देणेत येते.

मी ज्या कंपनीचे प्रतिनिधीत्व करीत होतो ती कंपनी वादी यांचे मालकीची आहे. सदर पोलीसांकडील तक्रार व न्यायालयातील तक्रार दाखल करताना मी वादीच्या सुचनेनुसार ती दाखल केली होती. त्यावेळी सदर दोन्ही तक्रारीतील दावा मिळकतीबाबतच्या कथनाची मी पडताळणी केली होती.

प्रश्न - सदरची न्यायालयातील तक्रार दाखल करताना दावा मिळकत ही अस्तीत्वात नाही व ती पूर्वीच विकली गेली आहे हे तुम्हाला माहिति होते ?

उत्तर - मला माहिती नव्हते.

सदर तक्रारीमध्ये खोटे कथन नमूद केले आहे किंवा कसे मी सांगू शकत नाही.

माझे प्रतिज्ञापत्रात कोणत्या इ मेल आयडी वरुन कोणत्या इ मेल आयडी वर मेल केला याचा उल्लेख नाही. सदर इ मेलचा मजकूर माझे प्रतिज्ञापत्रात नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृत |
| **( ए. जी. देशमुख )** | **( ए. जी. देशमुख )** |
| दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, वाई. | दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, वाई |

**दिनांक – १९.१२.२०२५.**